# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

---

**दिनांक ३०.०९.२०२६ बुधवार**

**मा. पोलीस आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली, आगामी ''७० वा धम्मचक्र प्रवर्तन दिन आणि नवरात्रोत्सव'' सणानिमीत्त आढावा बैठक संपन्न :-**

दिनांक ११.१०.२०२६ रोजी घटस्थापना होवुन ''नवरात्रोत्सव'' सुरू होणार असुन, दिनांक २०.१०.२०२६ रोजी ''७० वा धम्मचक्र प्रवर्तन दिन (विजयादशमी)'' सण साजरा करण्यात येणार असल्याने, मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचे अध्यक्षतेखाली **''७० वा धम्मचक्र प्रवर्तन दिन आणि नवरात्रोत्सव''** निमीत्त आयोजीत आढावा बैठक आज **दिनांक ३०.१०.२०२६ रोजी ११.०० वा.** कॉन्फरन्स हॉल, ०६ वा माळा, पोलीस भवन, नागपूर शहर येथे आयोजीत करण्यात आली होती. आढावा बैठकीदरम्यान, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, दिक्षाभुमी, नागपुर येथील पदाधिकारी, ड्रॅगन पॅलेस येथील पदाधिकारी, नागलोक येथील व्यवस्थापक, तसेच, पोलीस विभागाचे वरीष्ठ अधिकारी/महानगर पालीका, नागपुर/जिल्हाधिकारी कार्यालय, नागपुर/एन.आय.टी., नागपुर/महावितरण आणि अन्न व औषध प्रशासन विभागाचे पदाधिकारी हजर होते. बैठकीदरम्यान दिक्षाभुमी, बजाजनगर, ड्रॅगन पॅलेस टेम्पल, कामठी व नागलोक, भिलगांव यांठिकाणी येणाऱ्या लाखो अनुयायांच्या सुरक्षिततेच्या व सोयी-सुविधांच्या दृष्टीने उपस्थितांसोबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीदरम्यान आगामी सणांचे अनुषंगाने शहरातील संवेदनशिल व अतिसंवेदनशिल ठिकाणे, धार्मीक स्थळे, मिरवणुक मार्ग, गर्दीची ठिकाणी तसेच, महत्वाचे चौकांवर आवश्यक त्या सुरक्षा उपाययोजना करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. ७० वा धम्मचक्रप्रवर्तन दिन व विजयादशमी निमीत्त शहरात मोठ्या प्रमाणात नागरीकांची गर्दी होण्याची शक्यता लक्षात घेवुन, वाहतुक नियोजन, पार्कींग व्यवस्था पिण्याचे पाणी, स्वच्छता, विद्युत पुरवठा, वैद्यकीय सुविधा, आपात्कालीन परिस्थीतीतील प्रतीसाद व्यवस्था तसेच, महत्वाचे ठिकाणी पुरेसा पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून देण्याबाबत संबंधीत अधिकाऱ्यांना निर्देश देण्यात आले.

नवरात्रोत्सवाचे पार्श्वभुमीवर गरबा/दांडीया/देवि विसर्जन मिरवणुका, सार्वजनिक मंडळे व ईतर कार्यक्रमाचे ठिकाणी आवश्यक सुरक्षा व्यवस्था, महीला व बालकांच्या सुरक्षिततेसाठी विशेष उपाययोजना, सिसिटीव्हीचे माध्यमातुन निगराणी, वाहतुक नियंत्रण तसेच, अफवा व गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याबाबत निर्देश देण्यात आले.

सण उत्सवाचे काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे, नागरीकांची सुरक्षितता सुनिश्चीत करणे आणि सर्व कार्यक्रम शांततेत व सुरळीत पार पाडणे यासाठी सर्व संबंधीत विभागाचे अधिकारी व पोलीस यंत्रणांनी परस्पर समन्वयाने कार्य करावे अशा सुचना मा. पोलीस आयुक्तांनी दिल्या. तसेच, नागपुर शहरातील नागरीकांनी सण-उत्सव शांततेत व उत्साहात आणि बंधुभावाचे वातावरणात साजरे करावेत आणि सामाजीक सलोख्याचे वातावरण कायम राहील याकरिता कोणत्याही अफवांपासुन दुर राहुन, पोलीस प्रशासनास आवश्यक ते सहकार्य करावे असे आवाहन यावेळी करण्यात आले.

बैठकीमध्ये मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह पोलीस आयुक्त, नागपुर शहर, मा. अपर पोलीस आयुक्त, नागपुर शहर श्री. वसंत परदेशी, श्री. राजेंद्र दाभाडे, नागपुर शहराचे संपुर्ण मा. पोलीस उपायुक्त, संपुर्ण मा. सहा. पोलीस आयुक्त तसेच, महानगर पालीका नागपुर/जिल्हाधिकारी कार्यालय, नागपुर/एनआयटी नागपुर/महावितरण आणि अन्न व औषध प्रशासन विभागाचे पदाधिकारी तसेच, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, दिक्षाभुमी, नागपुर येथील पदाधिकारी, ड्रॅगन पॅलेस येथील पदाधिकारी, नागलोक येथील व्यवस्थापक व पदाधिकारी तसेच, नवरात्रोत्सव मंडळाचे सदस्यगण मोठ्या संख्येने हजर होते.






**(कामगिरी)**

**<u>१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—</u>**

दिनांक २९.०९.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये ०४ केसेसमध्ये ०४ ईसमावर कारवाई करून एकुण २,७७०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला. जुगार कायदा अन्वये ०२ केसेसमध्ये ०३ इसमांवर कारवाई करून एकुण ९,३४६/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दिनांक २९.०९.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक ३०.०९.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये **कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये ०५ इसमावर** कारवाई करण्यात आलेली आहे.

**वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ओव्हरस्पीड वाहन चालविणे कलम १८४ मोवाका २६ केस, सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये २४ केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १३० मोवाका अन्वये ५६ केसेस, ऑन रोड पार्कींग कलम १२२/११७ मोवाका अन्वये ३०६ केसेस, रॉग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये १५ केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४(ए) मोवाका अन्वये ४१ केसेस, ड्रायव्हींग विदाऊन युनिफार्म कलम २१/१८ मोवाका अन्वये ११ केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये ४९ केसेस, धोकादायकरित्या बेदरकारपणे वाहन चालविणे कलम १८४ मोवाका ०४ केस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये १० केसेस, विदाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४बी(१) मोवाका अन्वये २५ केसेस, विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये ९६२**

**केसेस, वाहन चालवितांना भ्रमणध्वनीचा वापर करणे ०८ केस, ड्रंकन ड्राईव्ह कलम १८५ मोवाका अन्वये १५ केसेस व इतर कलमांखालील वेगवेगळे गुन्हे असे एकुण १,५८१ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. ६,९९,१५०/—रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.**

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**<u>२) नंदनवन पोलीसांची कामगीरी :— वाहनचोरी व चोरीचे एकुण ०६ गुन्हे उघडकीस. १० दुचाकींसह एकुण ६ लाख रु. चा मुद्येमाल जप्त.</u>**

दिनांक २८.०९.२०२६ चे ०९.४० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे नंदनवन हद्यीत, नंदनवन कॉलनी, ज्ञानविकास शाळेजवळ प्रकाश भोयर यांचे घरी किरायाने राहणारे फिर्यादी नितीन मारोतराव सुर्यवंशी, वय २८ वर्ष यांनी त्यांची ॲक्टिवा दुचाकी क्र. एम.एच. २६ ए.एक्स ६३९८ किमती २०,०००/—रू. ची आपले घरासमोर लॉक व पार्क करुन ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची नमुद गाडी चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नंदनवन येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान, नंदनवन पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास केला असता, गुन्हयामध्ये एक अल्पवयीन बालक असल्याचे निष्पन्न केले. तसेच, त्यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, एक १४ वर्षीय मुलगा हा दररोज वेगवेगळया दुचाकी वाहनाने वस्तीत फिरत असतो. अशा माहितीवरुन परिसरात मुलाचा शोध घेतला असता, एक अल्पवयीन बालक एका मोपेडवरुन संशयीतरित्या फिरतांना दिसुन आला. पंचासमक्ष त्यास ताब्यात घेऊन, त्याचेजवळील ॲक्टिवा मोपेड क्र. एमएच २६ एएक्स ६३९८ बाबत कागदपत्रांची विचारपुस केली असता, त्याने नमुद वाहन हे चोरीचे असुन, त्याने ते नंदनवन कॉलनी येथुन चोरी केल्याचे सांगितले. विधीसंघर्षग्रस्त बालकास ताब्यात घेऊन, अधिक सखोल विचारपूस केली असता, त्याने या गुन्ह्याव्यतीरिक्त पोलीस ठाणे नंदनवन हद्दीतुन इतर ठिकाणी ०४ वाहनचोरी तसेच, पोलीस ठाणे कोतवाली हद्यीत एका घराचे उघडे दारातुन प्रवेश करुन लेडीज पर्स चोरी केल्याची कबुली दिल्याने, त्याचेकडून वाहनचोरी व चोरीचे एकुण ०६ गुन्हे उघडकीस आणलेले आहेत. त्याचे ताब्यातुन १) ग्रे ॲक्टिवा मोपेड क्र. एमएच २६ एएक्स ६३९८ २) ग्रे ॲक्टिवा मोपेड क्र. एमएच ४९ एबी ७१८७ ३) काळी ॲक्टिवा मोपेड क्र. एमएच ३१ ईव्ही ४००८ ४) काळी ॲक्टिवा मोपेड क्र. एमएच ३१ डीडी ०१९७ ५) काळी पल्सर मोटार सायकल क्र. एमएच ३५ एबी ६४१२ ६) ग्रे ॲक्टिवा मोपेड क्र. एमएच ३१ सीएफ १६२६ ७) पांढरी ॲक्टिवा मोपेड क्र. एमएच ४९ आर ५३७७ ८) गोल्डन ॲक्टिवा मोपेड क्र. एमएच ३१ बीपी ३७९६ ९) काळी प्लेझर मोपेड क्र. एमएच ३१ सीझेड ८३४९ १०) एक सोन्याची बांगडी वजनी १० ग्राम, टायटन घडयाळ, डोळयाचा चष्मा, वन प्लस कंपनीचे इअरबड, एक मोत्याचा नेकलेस व ५ जोड कानातले टॉप असा एकुण ६,००,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अनु. क्र. ७ ते ९ दुचाकींबाबत अभिलेख पडताळणी सुरु आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी, सह पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्रीमती रश्मिता राव पोलीस, उप आयुक्त (परि.क्र. ४), मा. श्री. महेश चव्हाण, सहा. पोलीस आयुक्त (सक्करदरा विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि. कैलाश देशमाने, सपोनि. उमाकांत राठोड, पोउपनि संतोषकुमार रामलोड, पोहवा. दिनेश जुगनाहाके, मपोहवा स्वाती कुमरे, पोअं. प्रविण मरापे, राहुल खळतकर यांनी केली.



**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे वाडी :— खुनाचे प्रयत्नाचे गुन्हयामध्ये, भा.न्या.सं. कलम १०३ कलमवाढ करुन, आरोपीस अटक.**

फिर्यादीचे वडील व आरोपीचे वडील हे एकमेकांचे नातेवाईक असुन, सन २०२३ मध्ये फिर्यादीचे काका धिरज बळीराम चव्हाण यांना आरोपी नामे सागर जगदीश चंद्रावत, वय २४ वर्ष, त्याचा भाऊ नामे जयदेव व वडील, तिघेही रा. ह.मु. आकोली, ता. सेलु जि. वर्धा यांनी संगनमताने शस्त्राने मारहाण करुन गंभीर जखमी केले होते. तेव्हा पोलीस तक्रार होऊन, पोलीसांनी तिन्ही आरोपीतांना गावातुन हद्दपार केले होते. आरोपीतांनी गावातुन जातांना, फिर्यादी व त्यांचे परिवारास पाहुन घेण्याची धमकी दिली होती. दिनांक २७.०९.२०२६ चे १५.२५ वा. चे सुमारास, फिर्यादीचा मोठा भाऊ नामे सचिन दिपक भुरानी, वय ३२ वर्ष हा पोलीस ठाणे वाडी हद्दीत नागपूर—अमरावती रोडवरील नर्मदा कॉम्प्लेक्स मधील निर्भय मोबाईल शॉपीचे बाजुला असलेल्या बालाजी आयुर्वेदीक दुकानात औषधी खरेदी करीत असता, त्याचे मागावर असलेला आरोपी सागर चंद्रावत याने फिर्यादीचे भावास जिवे ठार मारण्याचे उद्येशाने, त्यांचे छातीवर, मानेवर शस्त्राने मारुन गंभीर जखमी केले. गंभीर जखमी यास उपचाराकरीता मेयो हॉस्पिटल येथे दाखल करण्यात येवुन, त्यांचेवर उपचास सुरू होता.

याप्रकरणी फिर्यादी प्रदीप दिपक भुरानी वय २७ वर्ष रा. मुळ खापरी केने, पोस्ट पारडसिंगा, ता. नरखेड जि. नागपूर, ह.मु. इंगोले नगर, हुडकेश्वर रोड, नागपूर यांचे तक्रारीवरुन आरोपीविरुध्द पोलीस ठाणे वाडी येथे कलम १०९(१) भान्यासं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. दिनांक ३०.०९.२०२६ रोजी उपचारादरम्यान दाखल जमखीस डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केल्याने, नमुद गुन्हयात कलम १०३ भान्यासं. अन्वये कलमवाढ करण्यात आली आहे. आरोपीचा शोध घेऊन आरोपीस अटक करण्यात आली. आरोपीची मा. न्यायालयाकडून पोलीस कोठडी प्राप्त करण्यात आली आहे. पुढील तपास सुरु आहे.

**२) पोलीस ठाणे मानकापुर :— नो एन्ट्री झोनमध्ये वाहनासह प्रवेश करुन सदोष मनुष्यवध घडवून आणणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक २९.०९.२०२६ चे १७.४५ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे मानकापुर हद्दीत, गोधनी रोडवरून जड वाहनांना ठराविक कालावधीत प्रवेश बंदी असतांना, ट्रक क्र. एमएच ४० बीजी ३११४ चा चालक नामे दामोदर सिताराम सहारे वय ६१ वर्ष रा. नारी, तक्षशिला नगर, कपिलनगर, नागपूर याने त्याचे ताब्यातील ट्रकसह प्रवेश केला. आणि असे केल्याने इतरांचे जिवीतास धोका होऊ शकतो याची जाणिव असतांनासुध्दा त्याने नो एन्ट्रीझोनमध्ये त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन, पोलीस ठाणे मानकापुर हद्दीत, गोधनी रोडवरील वामन अमृततुल्य दुकानासमोरून चेतक इलेक्ट्रीक दुचाकी क्र. एमएच ४९ सीए ६५७३ ने जाणाऱ्या दोन मुलींना ओव्हरटेक करीत असता, आरोपीने त्याचे ताब्यातील वाहनाने डॅश

मारल्याने, चेतक मोपेडवरील मुलगी नामे मुस्कान उर्फ मनी देवांनद खियालदासानी वय १९ वर्ष रा. हेमु कॉलनी, जरीपटका ही ट्रकचे मागील चाकाखाली आली व तिचेसोबत असणारी मैत्रिण राजलक्ष्मी सचिन लोखंडे वय १९ वर्ष रा. गोपालनगर, बजाजनगर, नागपूर ही बाजुला फेकल्या गेल्याने दोघीही गंभीर जखमी झाल्या. मुस्कान हिला उपचाराकरीता मेयो हॉस्पिटल येथे नेले असता, तिला डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले. तसेच, जखमी राजलक्ष्मी हिचा उपचार विम्स हॉस्पिटल येथे सुरु आहे.

याप्रकरणी फिर्यादी संजय उर्फ सन्नी भगवानदास दिपानी वय ३९ वर्ष, रा. फ्लॅट क्र. ३०७, ए विंग, पंचम अपार्टमेंट, दीक्षित नगर, कपिलनगर, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे मानकापुर येथे ट्रक चालक आरोपीविरूध्द कलम १०५ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपी ट्रकचालनकास अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>३) पोलीस ठाणे एमआयडीसी :— हद्दपार ईसमास अटक.</u>**

दिनांक २९.०९.२०२६ चे १९.४५ वा. चे सुमारास, एमआयडीसी पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, वार्ड क्र. १, बारेकर बर्तन दुकानजवळ, भिमनगर, एमआयडीसी नागपुर येथे राहणारा हद्दपार इसम हा आपले घरी आला आहे. अशा खात्रीशीर माहीतीवरून, नमुद ठिकाणी पंचासमक्ष जावुन, पाहणी केली असता, तेथे एक इसम पोलीसांना पाहुन पळुन जाण्याचे तयारीत असतांना, त्यास घेराव टाकुन ताब्यात घेतले. त्यास त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव विकास उर्फ विक्की मोहनजी राहांगडाले, वय ३७ वर्षे, रा. घटनास्थळी असे सांगीतले. आरोपीचा अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ०७/२०२४ दिनांक १२.११.२०२४ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, फिर्यादी पोअं. किरण शेजवळ यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे एमआयडीसी येथे सपोनि. शशिकांत तायडे यांनी आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(ईतर)**

**<u>आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—</u>**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहिरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. ३ रे जिल्हा व अती. सत्र न्यायाधिश साहेब, नागपुर. | १००१४७/ २०१४ | कलम ३०७ भा.दं.वि. | आकाश राजकुमार मेश्राम, वय २५ वर्षे, रा. आसरे ज्वेलर्स समोर, वडपाखड रोड, जरीपटका, नागपुर. | १६.१०.२०२६ |

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**